ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 3.8014 (UIF)

REVIEW OF RESEARCH

VOLUME - 6 | ISSUE - 9 | JUNE - 2017

# चरित्र वाङ्मय संकल्पना



प्रा. घोडके बापूसाहेब गोरख
सी.डी. जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

## प्रास्ताविक :-

जगातील सर्व भाषामध्ये चरित्र हा वाङमय प्रकार रुजला व प्रस्थापित झालेला आहे. त्यामुळे प्रत्येक भाषेतील समीक्षकांनी चरित्र वाङ्मयाच्या निकषांची चर्चा ही मोठ्या प्रमाणात केलेली आहे. भारतीय भाषामध्ये वाङ्मयाची समीक्षा करण्यासाठी प्रामुख्याने इंग्रजी भाषेतील चर्चा प्रमाण मानली जाते. त्याला चरित्र वाङ्मयही अपवाद नाही. मराठी भाषेत चरित्र वाङ्मयाची संकल्पना स्पष्ट करणारे व.दा. बोरगावकर, अ.म.जोशी, सदा कऱ्हाडे, स.ग.मालशे, प्र.ना.परांजपे, जयवंत वष्ट, जांन्हवी संत, प्रा.देसाई व प्रा.लिमये अशा महत्त्वाच्या काही अभ्यासकांनी व विचारवंतानी मराठी चरित्र वाङ्मयाची चर्चा करुन ग्रंथ निर्मिती केली आहे. चरित्रांची संख्या, रचनात्मक वेगळेपण पाहता चरित्र वाङ्मय अभ्यास करण्यापूर्वी पाश्चिमात्य, भारतीय व मराठीतील चरित्र वाङ्मय प्रकाराचा व निकषांचा परिचय करुन घेणे आवश्यक आहे. चरित्र वाङ्मय प्रकाराची चिकित्सा व पुर्नमांडणी करता येते का ? या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे . त्याचा परामर्ष पुढीलप्रमाणे घेता येईल .

## विविध भाषातील चरित्र या शब्दाचे अर्थ :-

### 1. इंग्रजी भाषा :-

इंग्रजी साहित्यात 'चरित्र' या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून Biography हा शब्द प्रमाण मानला गेला. डायडनने Biography हा शब्द सर्व प्रथम वापरला. Biography या शब्दाची ग्रीक व्युत्पती bios म्हणजे life, (जीवन) आणि graphier म्हणजे to write (लिहिणे) या शब्दांच्या संयोगातून व मिश्रणातून झाली आहे. तरी पण चरित्र वाङ्मय संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विविध शब्दकोशातील Biography या शब्दाचे अर्थ पाहणे आवश्यक आहे.

Oxford Dictionary मध्ये Biography या शब्दाचा अर्थ biot comb from
1. life (biography) (जीवन).
2. biological of Living thing (सजीव )[1]

Graghy = com from forming nous dentating
1. descriptive science (geography)
2. technique of producing image (photography)
3. style or method of writing etc (calligraphy)[2]
1. वर्णनात्मक शास्त्र.
2. प्रतिमा विकसित करण्याचे तंत्र.
3. लिखानाची पध्दत.

Oxford शब्दकोशात दिलेल्या या वरील शब्दांचा अर्थ bio हा शब्द greek brirs life या शब्दापासून तयार झाला आहे. याचा मराठीत अर्थ 'जीवन व सजीव' असा आहे. Graphy या शब्दाचा मराठीत अर्थ 'आरेखन' असा प्रतीत होतो. थोडक्यात biography या शब्दाचा मराठीत अर्थ 'जीवनलेख' असा प्रतीत होतो, म्हणजे व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाचा क्रम आणि जीवनातील महत्त्वाच्या घटना व प्रसंगांना सामन्यत जीवन आलेख असे म्हणता येईल.

त्याचप्रमाणे Collms cobuld English hunguahe dictionary या शब्द कोशात biography = biography is an account of someone's life that has been written by some one else[3] असा अर्थ दिला आहे. एखाद्या व्यक्तीचा व्यक्तिगत जीवनपट दुसऱ्यां व्यक्तीने मांडणे,असा होतो. तसेच the oxford dictionary and the saorus या इंग्रजी शब्दकोशात biography या शब्दाचा अर्थ -

1. a written account of a persons life usually by another.
2. Such writting as a branch of literature.
3. The course of living [usualy human] beings life.[4] असे अर्थ दिले असून त्याचा मराठी अर्थ -

1. एखाद्या व्यक्तीचा व्यक्तिगत जीवनपट दुसऱ्या व्यक्तीने मांडणे म्हणजे चरित्र होय.
2. ही एक साहित्याची शाखा आहे.
3. ही एक जीवन जगण्याची शैली आहे.

असे होतात.

The oxford Dictionary मध्ये biography = sb - 2 an earlier form of cinematograph introduced from the U.S.[5] असा अर्थ दिला आहे .त्याचा मराठीत अर्थ - अमेरिकन दृष्टीकोनानुसार चरित्र लेखन म्हणजे चित्रपट निर्मितीच्या आगोदरची पायरी होय,असा होतो. तर इंग्रजी - मराठी शब्दकोशात biography या शब्दाचा अर्थ - एखाद्या माणसाची दुसऱ्या माणसाने लिहिलेली जीवनकथा, चरित्र .[6] असा अर्थ दिला आहे. The little modern dictionary मध्ये biography या शब्दाचा अर्थ - written life of a person. चरित्र,जीवनचरित्र.[7] असा वीर कृष्णाजी भास्कर यांनी दिला आहे .

Biography या शब्दाचा अर्थ Encyclopedia Britanica या जागतिक शब्दकोशात सविस्तरपणे दिला आहे. तो चरित्र वाङ्मय प्रकार समजून घेण्यसाठी अत्यंत उपयुक्त आहे . या शब्दकोशात biography या शब्दाविषयी म्हटले आहे की , A narrative which seeks, consciously and artistically, to record the actions and recreate the personality of anlndividual life.Unlike history it deals with the individual;unlike time the biographer shares with the historian a concern for truth and he shares with the novelist the ambition to create a work of art .Thus the great biographies of the world are those which have presented their subjects as they were but which have gone beyond the mere collection of facts to the creation of living portrait Biography is of perennial interest,partly because it deals with famous or notorious or interesting personalities,but more importantly because its subject matter is human nature . Hence biography as an art may legitimately deal with any individual life no matter how humble,provided it is made the vehicle for a penetrating analysis of human passion and human motives.[8]

" चरित्रात्मक लेख / कथन सुप्तपणे आणि कलात्मकपणे व्यक्तिगत जीवनाच्या कृतीचे नोंद ठेवून व्यक्तिमत्त्वाची पुर्ननिर्मिती करतात. इतिहासापेक्षा वेगळा त्याचा व्यक्तिगत जीवनाशी संबंध असतो. तसेच कादंबरीपेक्षा भिंन्न कपोलकल्पीत कथेपेक्षा भिंन्न ते वास्तविकपणे जे जीवन जगले आहेत त्याची नोंद ठेवते. त्याचप्रमाणे चरित्रात्मक लेखक सत्यासाठी कळकळ व्यक्त करणाऱ्या इतिहासकारासमवेत आपल्या भावना व्यक्त करतो आणि तो चरित्रात्मक लेखक कलाकृती निर्मितीची महत्त्वाकांक्षा कादंबरीकारासमवेत आपले विचार व्यक्त करतो. त्याचप्रमाणे जगातील महान चरित्रात्मक लेखक की, ज्यांनी त्याचे विषय जसे होते तसेच सादर केलेले आहेत, पण केवळ वस्तुस्थितीपेक्षा पूर्ण वेगळ्या पध्दतीने तंतोतंत तसबिरीसारखी निर्मिती करण्यासारखे त्याचे संग्रह केलेले आहेत. चरित्रात्मक लेख हे आनंद देणारे असतात तसेच अंशत: आनंद देणारे असते, कारण ते प्रसिध्द अथवा कुप्रसिध्द अथवा रोमहर्षक व्यक्तिमत्त्वाशी संबंधित असतात पण अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांचा मूळ विषय हा मानवी असतो म्हणून चरित्रात्मक लेख लिहिणे ही एक कला ही कोणत्याही व्यक्तिगत जीवनाशी कायदेशीरपणे संबंधित असू शकते. मग त्याचा विषय किती ही विनम्र असो या अटीवर की, मानवी भावनांचे आणि मानवी हेतूचे मर्म भेद करणारे सूक्ष्म परीक्षणाकरीता ते एक माध्यम असावे.

थोडक्यात चरित्रामध्ये व्यक्तिमत्त्वाची पुर्नर्निमिती चरित्रकार करीत असतो. त्यामध्ये चरित्रनायकाच्या जीवनातील चांगल्या वाईट अशा दोन्ही प्रकारच्या घटना व प्रसंगाची सुप्तपणे नोंद घेतली जाते. गतकाळातील घटना व प्रसंग सांगण्याच्या निमित्ताने चरित्रलेखन इतिहासाच्या जवळ जाते तर घटना प्रसंग कलात्मपणे मांडण्याच्या अंगाने ललित साहित्याच्या जवळ जाते. त्यामुळे चरित्र वाङ्मय हे केवळ घटना प्रसंगाची सूची असत नाही तर तो एक चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध असतो. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू सूक्ष्मपणे उलगडून दाखविण्यात चरित्र वाङ्मयाचे खरे यश असते. त्यामुळे चारित्रकार चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाची मांडणी करताना चरित्रनायकाच्या जीवनातील घटना प्रसंगाची वस्तुनिष्ठ व कलात्मकपणे माडंत असतो. यावरुन इंग्रजी शब्दकोशामध्ये 'चरित्र' या शब्दाचा अर्थ प्रमुख्याने साहित्याच्या अंगाने घेतला असल्याचे दिसून येते.

### 2. संस्कृत भाषा :-

इंग्रजी भाषेप्रमाणे भारतातील प्रचीन ग्रंथभाषा संस्कृत भाषेतील 'चरित्र' या शब्दाची व्युत्पत्ती व अर्थ पहाणे आवश्यक आहे. संस्कृत भाषेत 'चरित्र' या शब्दाची व्युत्पत्ती चर+इत्र या धातू पासून झाली आहे.[9] चर म्हणजे हलणारे, जंगम, सजीय असे त्याचे अर्थ आहेत.[10]

'संस्कृत - मराठी' शब्दकोशात वासुदेव गोविंद आपटे यांनी 'चरित्र' = (न) आचरण, इतिहास .[11] असा अर्थ दिला आहे. संस्कृत शब्दकोशकार आपटे वि.आ.यांनी 'संस्कृत- मराठी' शब्दकोशात चरित्र या शब्दाचा अर्थ 'चरितम = (न) केलेले, वागणूक.[12] असा दिला आहे. कै.जर्नादन विनायक ओक यांनी ही चरित्र = 1) करणे, पाळणे. 2) वर्तन. 3) स्वभाव. 4) चरित्र, इतिहास. 5) कर्तव्य. 6) सदाचरण.[13] असे विविध प्रकारचे अर्थ दिले आहेत. आपटे वामन शिवराम यांनी लिहिलेल्या 'संस्कृत हिंदी' शब्दकोशात चरितम = (चर+इत्र) 1)व्यवहार, आदत, चालचलन, अभ्यास, कृत्य, कर्म. 2) अनुष्ठान, पर्यवेक्षण. 3) इतिहास, जीवनचरित्र, आत्मकथा, कृाांत, सहसकथा. 4) प्रकृति ,स्वभाव. 5) कर्तव्य, अनुमोदित नियमोका पालन. असे विविध अर्थ दिले आहेत. तसेच सूर्यकांन्त यांनी ही आपल्या शब्दकोशात चरित्र = न. चरित्र, व्यवहार, जीवनी.[15] असे अर्थ दिले आहेत. तर शर्मा द्वारका प्रसाद यांनी 'संस्कृत शब्दार्थकौस्तुभ' या कोशात चरित्र = (न) (चर+इत्र) आचरग, व्यवहार, चालचलन, कर्तव्य, कर्मकलाप, शील, स्वभाव, सदाचार, जीवनी, वृत्त[16] असे अर्थ दिले आहेत.

### 3. हिंदी भाषा :-

हिंदी ही भारताची राष्ट्रीय भाषा आहे. त्यामुळे हिंदी भाषेत 'चरित्र' शब्दाचा कोणते अर्थ दिले आहेत हे पाहणे आवश्यक आहे. आचार्य रामचंद्र वर्मा यांनी आपल्या 'प्रामाणित हिंदी' कोशात चरित्र या शब्दाचा अर्थ 1) स्वभाव. 2) जीवन मे किए जानेवाला कार्य या आचरण. 3) इस प्रकार के कार्य या आचरणोंका स्वरुप जो किसी की योग्यता मनुष्यत्व आदि का सूचक होता है।[17] डॉ. भोलानाथ तिवारी यांना 'हिंदी पर्यायवाची' कोशामध्ये चरित्र 1) आचरण, आचार, आचार-विचार, आचार-व्यवहार, चालचलन, शील, शील-स्वभाव. 2) सच्चरित्रता, सदाचार. 3) आत्मकथा, इतिवृत्त, इतिहास कथा, जीवनी, वृत्तान्त. 4) कास्ट,कॅरेक्टर पात्र.[18] असे अर्थ दिले आहेत. चातक गोविन्द यांनी 'आधुनिक हिंदी' शब्दकोश या कोशात चरित्र या शब्दाचा अर्थ चरित्र = पु.स - आचरण, व्यवहार, जीवनकी घटनो का विवरण, जीवनी, जीवनकथा, वृत्तात, जीवनवृत्त.[19] असे दिल आहेत. श्याम सुंदरदास यांनी आपल्या हिंदी शब्दकोशात चरित्र या शब्दाचा अर्थ चरित = संज्ञा पु. (स) स्वभाव, वह जो किया जाय कार्य, करनी, करतूत[20] असे दिले आहेत. 'आदर्श हिंदी' शब्दकोशात पंडित रामचंद्र पाठक यांनी चरित्र या शब्दाचा अर्थ 1) किसी मनुष्य के जीवन की विशेष घटनाओ का वर्णन. 2) स्वभाव, करनी, करतूत.[21] असे अर्थ दिले आहेत.

हिंदी शब्दकोशकारांनी चरित्र या शब्दाचे अर्थ स्वभाव, आचरण, आचार, व्यवहार, चालचलन, शील, सदाचार, आत्मकथा, इतिवृत्त, इतिहास, कथा, जीवनी, पात्र, जीवनचरित्र असे विविध प्रकारचे अर्थ दिले आहे. मानवाच्या वर्तनाला समोर ठेऊन 'चरित्र' या शब्दाचा अर्थ दिला आहे, त्यामुळे हिंदी शब्दकोशातील चरित्र या शब्दामध्ये चरित्र वाङ्मय ही संकल्पना स्पष्ट होत नाही.

### 4. मराठी भाषा :-

कृ.पा.कुलकर्णी यांनी 'मराठी व्यत्पति कोशा'त चरित्र शब्दाची व्यत्पति - चरित्र = (न) आचरण, जीवनयात्रा, कृती, पराक्रम (सं - चर, चरित्र, चरित ; हि . चरित, पं.चरतर, सिंह - सिरित = चालरीत, अकमसा; चरितार्थ = पोट भरणे, उदरनिर्वाह ;

चरित्र, इतिहास, कथा.)[22] असा दिला आहे. दाते, कर्वे, चांदोरकर, दातार यांनी संपादित केलेल्या 'महाराष्ट्र शब्दकोशात' चरित्र या शब्दाचा अर्थ - 1) कृत्ये, क्रिया, आचरण, वर्तन. 2) अवस्था, स्थिती, प्रकार. 3) देवांचे, वीरांचे, पराक्रम, महत्कृत्ये, मर्दुमकीची कामे. 4) इतिहास कथा, गोष्ट, प्रकार. 5) विशिष्ट व्यक्तीचा आयुष्यकम ; तो वर्णन करणरा ग्रंथ.[23] असा दिला आहे. डॉ.प्र.न.जोशी यांनी आपल्या 'आदर्श मराठी शब्दकोशात' चरित्र या शब्दाचा अर्थ चरित्र = (न) 1) चरित्र, कृत्य, आचरण, वर्तन. 2) अवस्था, स्थिती, प्रकार. 3) देवांचे, वीरांचे पराक्रम. 4) इतिहास, कथा, गोष्ट, प्रकार. 5) व्यक्तीचा आयुष्यक्रम सांगणारा ग्रंथ.[24] असे दिले आहे. द.ह.अग्निहोत्री यांनी 'अभिनव मराठी' शब्दकोशात चरित्र या शब्दाचा अर्थ चरित्र = अव-न-चरित. 1) आचरण, वर्तन. 2) अवस्था, स्थिती. 3) देव इ.चे पराक्रम. 4) इतिहास, कथा. 5) एखाद्या व्यक्तीचा आयुष्यक्रम.[25] असा दिला आहे. 'सुगम मराठी शब्दकोशात' चरित्र या शब्दाचा अर्थ - 1) अचरण, वर्तन. 2) पराक्रम, महत्कृम किंवा इतिहास, कथा. 4) कोणत्याही व्यक्तीचा आयुष्यक्रम किंवा इतिहास .[26] असा श्री.न.बनहट्टी यांनी दिला आहे. तर सदा कऱ्हाडे चरित्र या शब्दाची उत्पती विषयी म्हणतात,''चरित्र अथवा चरित हे दोन्ही शब्द संस्कृत मधील 'चर' या धातूपासून सिध्द झालेले आहेत. या धातूचे अनेक अर्थ आहेत. त्यात करणे (To do), सिध्दिस नेणे, (To perform), कृती करणे (To Act), वर्तणे (Behave) हे अर्थ महत्त्वाचे आहेत. चरित या शब्दाचा अर्थ ही आचरलेले (Acted, Behaver) असा आहे आणि चरित्र या शब्दाचाही अर्थ चालचलवणुक किंवा वागण्याची तऱ्हा (Behaver), वर्तन (Condact), संपादणूक (Performance) असे आहेत''.[27]

मराठी भाषेतील शब्दकोशकरांनी चरित्र या शब्दाचे अर्थ प्रामुख्याने - चरित्र आचरण, जीवनयात्रा कृति, वर्तन, देवाचे-वीरांचे पराक्रम महत्कृत्ये, मर्दुमकीची कामे, कथा, इतिहास, आयुष्यक्रम, अवस्था, स्थिती, व्यक्तीचा आयुष्यक्रम सांगणारा ग्रंथ. असे विविध प्रकारचे अर्थ विविध शब्दकोशात दिले आहेत. हे अर्थ देताना व्यक्तीच्या विशिष्ट वर्तनालाच शब्दकोशकारांनी महत्त्व दिले आहे. त्यामध्ये वीरांचे, पराक्रमी पुरुषांचे, देवाचे वर्तन, आचरण, महत्कृत्ये व मर्दुमकी यावर जास्त भर दिला आहे. थोडक्यात मराठीमध्ये 'चरित्र' या शब्दाचा अर्थ चरित्रनायक व त्याच्याशी संबधित घटना प्रसंगाचे वर्णन महत्त्वाचे आहे.

अशा प्रकारे इंग्रजी, संस्कृत, हिंदी व मराठी शब्दकोशातील 'चरित्र' या शब्दाचे त्या त्या भाषेमध्ये वरील प्रमाणे विविध अर्थ दिले आहेत. त्यातून चरित्र संकल्पनेकडे व शब्दाकडे त्या त्या भाषिक समुदायाचा पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट होतो. संस्कृत शब्दकोशात व्यक्तीची चांगली वाईट वागणूक व त्यातून व्यक्त होणारा व्यक्तीचा स्वभाव त्याचे वर्तन व इतिहास या गोष्टीला प्राधान्य दिले आहे. हिंदी शब्दकोशातही 'संस्कृत' प्रमाणेच अर्थ अपक्षित आहे, परंतु व्यक्तीचे आचार, विचार, स्वभाव, त्याच बरोबर व्यक्तीचे चरित्र्य / शीलाशी निगडीत असणरे वर्तन अपेक्षित आहे. थोडक्यात संस्कृत व हिंदी शब्दकोशात त्या भाषिक समुदायाने किंवा भाषेत 'चरित्र' या शब्दाचा अर्थ वाङ्मयाच्या अंगाने घेतल्याचे दिसून येत नाही. भारतीय भाषिक समाजाने 'चरित्र' या शब्दाकडे साहित्याच्या अंगाने पहिले नाही. इंग्रजी भाषेच्या संपर्कामुळे व प्रभावामळे आता जरी हा समाज काही प्रमाणत चरित्र शब्दाकडे व संकल्पनेकडे वाङ्मयाच्या दृष्टीने पहात असला तरी मूळ दृष्टीकोन मात्र साहित्याच्या अंगाने विचार करणारा नाही हे मान्य करावे लागते, कारण भारतात धार्मिकतेचा प्रभाव असल्यामळे धर्माचा प्रभाव व्यक्तीच्या जीवनावर व विचारावर पडत असतो. त्यामुळे चरित्र या शब्दाचा अर्थ साहित्याच्या अंगाने घेतलेला नसावा हे मराठी भाषिक समुदायाचा वाङ्मय इतिहास पाहिले असता निदर्शनास येते .

संस्कृत, हिंदी, मराठी भाषेत वरील प्रमाणे अर्थ अभिप्रेत आहे, मात्र हिंदीमध्ये व्यक्तीचे निंदनीय वर्तन त्याच्या शीलाशी निगडित आहे. व्यक्तीच्या विचार व वर्तनच्या अंगाने 'चरित्र' या शब्दाचा अर्थ घेतला आहे. प्रामुख्याने हिंदी व संस्कृत शब्दकोशात 'चरित्र' या शब्दाचा अर्थ या भाषिक समुदयाने व्यक्तीचा इतिहास, व्यक्तीची वागणूक, विचार या दृष्टीने घेतल्याचे दिसत नाही हे मान्य करावे लागते, तर इंग्रजी शब्दकोशात चरित्र (Biography) या शब्दाचा अर्थ 'एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचा लिहिलेला इतिहास किंवा साहित्याची एक शाखा' या अर्थाने घेतला आहे. म्हणजे इंग्रजी भाषेत चरित्र ही संकल्पना साहित्याच्या अंगाने वापरल्याचे दिसून येते तर व्यक्तीचा लिखित इतिहास अपेक्षित आहे. विशिष्ट प्रकाराचा इतिहास या समुदयाला अपेक्षित आहे. मराठी शब्दकोशात व्यक्तीची वागणूक, इतिहास, व्यक्तीचे विचार तसेच साहित्याच्या अंगाने लिखित स्वरुपातील माहिती हा अर्थ 'चरित्र' या शब्दासाठी अभिप्रेत आहे, पण चरित्र नायक व्यक्ती कोण असावी ? त्या व्यक्तीची कोणता इतिहास व माहिती सांगावी ? या विषयी मराठी साहित्यात काही नियम व बंधने आहेत. विशिष्ट व्यक्ती म्हणजे देव, वीर, महात्मे यांचे चरित्र लिहावे व त्यांच्या वीरपणाच्या घटना व प्रसंग सांगणारेच असावे. थोडक्यात व्यक्तीचा इतिहास व वर्तनाला प्राधान्य दिले आहे. मराठी भाषेत साहित्या संबंधी व व्यवहारा संबंधी 'चरित्र' या शब्दात अर्थ भिंन्नता दिसून येते.

**समारोप :-**

इंग्रजी, संस्कृत, हिंदी व मराठी शब्दकोशात 'चरित्र' या शब्दाचा अर्थ विविध अंगाने घेतला आहे. भारतीय भाषिक समाजाने दैनंदिन भाषा व्यवहारातील व व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारा अर्थ घेतला आहे. उदा. स्वभाव, विचार, आचरण, शील असे अर्थ प्रामुख्याने घेतले आहेत, कारण वाङ्मयासंबंधी हा भाषिक समाज जागृत नसल्यामुळे व धार्मिकतेचा मोठा प्रभाव असल्यामुळे हा भाषिक समाज साहित्याकडे सुध्दा धार्मिकतेच्या अंगाने पाहत आहे. या भाषिक समाजाचा वाङ्मय इतिहास पाहता चरित्र वाङ्मयाची संकल्पना पूर्णपणे स्पष्ट होत नाही, परंतु सुरुवातीपासूनच पाश्चिमात्य विचारवंतानी चरित्र वाङ्मयाची संकल्पना साहित्य विषयक मांडली आहे. चरित्र या शब्दाचा अर्थ इंग्रजी विचारवंतानी पूर्वीपासूनच साहित्याच्या अंगाने विचार केला. त्यामुळे त्यांनी लिहिलेली चरित्र ही या शब्दाचा अर्थ स्पष्ट करणारी आहेत. त्यामुळे चरित्र वाङ्मय ही संकल्पना पाश्चिमात्य राष्टात मोठ्या प्रमाणात विकसित झाली आहे. संस्कृत, हिंदी व मराठी कोशकारांचे चरित्र वाङ्मय ही संकल्पना स्पष्ट करण्यावर भर देतात असे अभ्यासाअंती दिसून येते. पाश्चिमात्य व पौर्वात्य शब्दकोशाचा आढावा घेतल्यानंतर चरित्र या संकल्पनेत चरित्र म्हणजे व्यक्तीचा संपूर्ण जीवनालेख किंवा इतिहास होय परंतु इतिहास सांगत असताना चरित्रनायकाच्या जीवनात घडलेल्या घटना, प्रसंगाचा समावेश करुन त्या काळातील आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व शैक्षणिक परिस्थितीचा प्रभाव चरित्रात पहावयला मिळणे आवशयक आहे. तर चरित्रनायकाचे व्यक्तिचित्रण करताना स्वभाव, आचार, विचार, वर्तन, व्यवहार, चारित्र्य इ.गोष्टीचा समावेश करता येईल. 'चरित्र' या शब्दाचा अर्थ पाश्चिमात्य भाषेमध्ये साहित्यांच्या अंगाने घेतलेले आहे. त्यामुळे इंग्रजी भाषेतील समीक्षकांनी चरित्रवाङ्मय संकल्पनेने विषयी विविध अंगाने विचार करुन महत्त्वपूर्ण विचार मांडलेले दिसून येतात. त्यामुळे पाश्चिमात्य साहित्यात चरित्र वाङ्मयाचा चांगल्या प्रकारे विकास झालेला आहे. चरित्रवाङ्मय संकल्पना चांगल्या प्रकारे पाश्चिमात्य साहित्यात रुजली आहे. परंतु भारतातील विविध भाषामध्ये 'चरित्र' या शब्दाचा अर्थ आचरण, व्यवहार, व्यक्तीचा स्वभाव, शील, वर्तन, चारित्र्य व इतिहासाच्या अंगाने घेतल्याचे दिसून येते. सहाजिकच चरित्रवाङ्मयात याचे प्रतिबिंब पडल्याचे दिसून येते. इंग्रजी वाङ्मयाच्या संपर्कामुळे 'चरित्र' या शब्दाचा अर्थ साहित्याच्या अंगाने घेण्यात आला आहे हे स्पष्ट होते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. The Pocket Oxford dictionary of current English frist edited by F.G. and H.W. Fowler Page No. 78.
2. उपरोक्त पृ. 381
3. Collms cobuld English hunguage Dictionary Page No. 131.
4. The Oxford Dictio Collms cobuld English hunguage Dictionary Page No.nary and thesaous page No. 138.
5. The Oxford English Dictionary Volume I-A-4 Page No. 266
6. English Marathi Dictionary Page No. 70.
7. The Little modern Dictionary - Page No. 92.
8. Eneyclopeda- Britinnica, volume-3 balfora Page No. 638.
9. शर्मा द्वारका प्रसाद - 'संस्कृत - शब्दार्थ कौस्तुभ', पृ. 425.
10. आपटे वि. आ. - 'संस्कृत - मराठी- इंग्रजी लघुकोश', पृ.96.
11. आपटे वासुदेव गोविंद - 'संस्कृत मराठी कोश', पृ. 76.
12. आपटे वि. आ. - 'संस्कृत-मराठी-इंग्रजी लघुकोश', पृ. 96.
13. औक -'गीर्णाणलघुकोश', पृ. 200.
14. आपटे वामन शिवराम - 'संस्कृत हिंदी शब्दकोश', पृ. 374.
15. सूर्यकांन्त - 'संस्कृत-हिंदी-इंग्लिश कोश', पृ. 199
16. शर्मा द्वारका प्रसाद - 'संस्कृत शब्दर्थ कौस्तुभ', पृ. 425.
17. वर्मा रामचंद्र - 'प्रामाणिक हिंदी कोश', पृ. - 252.
18. तिवारी भोलेनाथ - 'हिंदी पर्यायवाची कोश', पृ. - 173.
19. चातक गोविंद - 'आधुनिक हिंदी शब्दकोश', पृ. - 202.
20. श्याम सुंदरदास -'हिंदी शब्दसागर तृतीय भाग', - पृ. क्र. - 1483.

21. पाठक रामचंद्र - 'आदर्श हिंदी शब्दकोश', पृ. - 222
22. कुलकर्णी कृ. पा. -' मराठी व्यत्पतिकोश ऐतिहासिक आणि तौलनिक', पृ. 294.
23. दाते, कर्वे, चांदोरकर, दातार - 'संपादक महाराष्ट्र शब्दकोश', विभाग तिसरा पृ. - 1150.
24. जोशी प्र. न. - 'आर्दश मराठी शब्दकोश', पृ. - 297.
25. अग्निहोत्री द, ह - 'अभिनव - मराठी-मराठी शब्दकोश', भाग 2 पृ. - 374.
26. बनहट्टी श्री. ना. - 'सुगम मराठी शब्दकोश', पृ. 163
27. कऱ्हाडे स.दा.- 'चरित्र आणि आत्मचरित्र', लोकवाङ्मय ग्रह प्रकाशन प्रथम आवृत्ती, जुलै 1976 पृ 6.